# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/01/2024 (बुधवार) सायंकाळ

---

## अ‍ॅल्युमिनीअम तार चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील ढवळापुर ते आंजनगाव शिवार येथे दिनांक २९/०१/२०२४ चे १९.०० वा. ते दिनांक ३०/०१/२०२४ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– मंगेश अशोक गायसमुद्रे, वय ३३ वर्ष, रा. फ्रेंडस कॉलनी नागपुर यांनी दि. ३०/०१/२०२४ रोजी पो.स्टे. ला येवुन तोंडी रिपोर्ट दिला की, कोणीतरी अज्ञात चोराने ढवळापुर ते आजनगांव रोडवरील राऊत डिपीवरील रवी गोंविदराव राऊत यांचे शेतातील ०४ अ‍ॅल्युमिनियम तार किंमती अंदाजे ४५००/– रू. चा मुद्देमाल चोरून नेला व पोल तोडुन नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस नायक निलेश उईके यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक निलेश उईके मो. नं. ९०७५१६२८९६ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. भिवापूर :– अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील अडयाळ भिवापूर येथे दिनांक २५/०१/२०२४ चे ११.०० वा. दरम्यान यातील अडयाळ ग्रामपंचायतकरीता शासकीय निधीतून व्यायाम शाळेकरीता साहीत्य मिळाले होते त्यामध्ये १) स्टेशन मल्टीजीम यूनिट किंमती २०,०००/– रू., २) बेंन्च फ्रेश बेंन्च किंमती २०,०००/–रू., ३) इन्क्लीन बेंन्च २०,०००/– रू., ४) रॅक फार २० डंबल्स किंमती १०,०००/– रू. ५) वन प्लेट रैंक किंमती ५,०००/– रू., ६) बारबल बाल ५ फीट व ६ फीट किंमती ५,०००/– रू. असे एकूण ८००००/– रू. चा मुद्देमाल व्यायाम शाळेचे सामान ठेवणेकरिता नियूक्त खोली नसल्याने ग्रामपंचायत अडयाळचे परीसरात ठेवण्यात आले होते. फिर्यादी हा प्रजासत्ताक दिनानिमीत्य सामान बघण्याकरीता गेला असता दिसून आले नाही ते कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– योगेश सोमाजी तुमडाम, वय ३८ वर्ष, रा. अडयाळ त. भिवापूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार धात्रक यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार धात्रक मो. नं. ९५४५३५५४७० हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत स्पर्श हॉस्पीटल रेवतकर ले आउट उमरेड येथे दि. १७/०१/२०२४ रोजी सकाळी ०९/०० वा. दिघोरी नागपूर येथील हॉस्पीटल मध्ये उपचाराकरीता जाणे असल्याने फिर्यादी नामे— अशोक विठोबा श्रिखंडे, वय ४८ वर्ष रा. वार्ड क्र. ०३ मकरधोकडा ता. उमरेड यांनी मोटरसायकल क्र. एम. एच—४०/एबी— ३२५३ क्रमांकाची स्पर्श हॉस्पीटल रेवतकर ले आउट उमरेड समोर रोडचे कडेला लावली होती. कारण गावातील लोक बाहेर गावी जातांना स्वत:चे मोटरसायकल लावून नागपूरला निघून जात असल्याने फिर्यादीने सुद्धा तिथे आपली मोटरसायकल उभी करून नागपूरला निघून गेले असता हॉस्पीटलचे काम आटपवून अंदाजे दुपारी ०१/३० वा. ते ०१/४५ वा. दरम्यान बसने उमरेडला परत आले तेव्हा घरी जाण्यासाठी फिर्यादी हा मोटरसायकलकडे गेला तेव्हा त्यांना त्यांची मोटरसायकल दिसली नाही आजूबाजूला शोध घेतला असता मिळून आली नाही, मोटरसायकल स्प्लेंडर प्लस कंपनीची एम. एच.— ४०/ए.बी— ३२५३ किंमती २०,०००/—रू. ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार आशिष खोडे यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक श्रीचंद पवार मो. नं. ८७८८३८०५९५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**